माहिती हवीय?

संगीता नलावडे, पिंपरी.

□ *कैसे कहूं, मरीन ड्राईव्ह, माँ बहन और बीवी, जमाने से पूछो* या चित्रपटातील नायक-नायिका आणि दिग्दर्शक कोण?

— *कैसे कहूं?* नायक-नायिका विश्वजीत-नंदा, दिग्दर्शक आत्माराम, *मरीन ड्राईव्ह* नायक-नायिका अजीत-बीना रॉय, दिग्दर्शक जी. पी. सिप्पी, *माँ बहन और बीवी* नायक-नायिका कबीर बेदी-प्रेमा नारायण, दिग्दर्शक जी हरबन्सकुमार, *जमाने से पूछो* अंबरीशकुमार, कादर खान, मुराद हे कलाकार होते. एवढीच माहिती उपलब्ध आहे. अब्रार या चित्रटाचे दिग्दर्शक होते.


रविकांत साखरे, जामखेड, कुंभारतळे.

□ जादू आणि चमत्कार या थीमवर आतापर्यंत किती चित्रपट निघाले आहेत? त्यातील कलाकार आणि दिग्दर्शक कोण?

— जादू आणि चमत्कार या थीमवर आतापर्यंत अगणित चित्रपट निघाले आहेत. त्या सर्वांची यादी नावासह देणं शक्य नाही. काही निवडक चित्रपटांची यादी देता येईल. ती पुढीलप्रमाणे:- मूकपट जमान्यात १९२२ला निर्माण झालेला *प्रिन्स बुदूर* आपल्याकडे निर्माण झालेला पहिला जादूपट, एडन डेलियस, ई. डी.हिंगोरी या चित्रपटातील प्रमुख कलाकार होत. दिग्दर्शक जे. जे. मादन त्यानंतर मूकपटजमान्यात *रत्नमंजिरी* कलाकार मा. विठ्ठल, मिस मेरी, दिग्दर्शक एम. जोशी, *अलिबाबा और चालिस चोर* कलाकार सुलोचना, कवी मायर्स, जिल्लो, जमशेटजी, बाबूराव संसार, दिग्दर्शक वकील, *गुलसनोबर* कलाकार यकबाल, हीरा, खलिल दिग्दर्शक होमी मास्टर, *लेडी ऑफ द लेन* कलाकार एर्मलिन, एम. वकिल, जिल्लो, झेबुन्नीसा, एल्जर, जमशेटजी, दिग्दर्शक रमा शंकर चौधरी, *गुलशन-ए-अरब* कलाकार एर्मलिन, गोहर, जमशेटजी, ई. बिलमोरिया डब्ल्यू. एम. खान, दिग्दर्शक के. पी. भावे, *जादूई बन्सरी:* कलाकार सुलोचना रूबी मायर्स, दिग्दर्शक बिलमोरिया, गौहर, दिना बेली, घोरी, मजहर खान, रूस्तूमजी, जमशेटजी, दिग्दर्शक एम. भवनानी, *सिंदबाद द सेलर:* कलाकार जमशेटजी, खानसाहब, सुशीला मुजहर खान, एल्जर वागळे, सॅन्डो, दिग्दर्शक आर. जी. तोरणे, *शिरीन ऑफ बगदाद:* कलाकार डी. बिलमोरिया, माधुरी बावाव्यास, मास्टर थत्ते, दिग्दर्शक नानुभाई वकिल हे ठळक जादूई चित्रपट निर्माण झाले. बोलपटयुगात निर्माण झालेला पहिला ठळक जादूई चित्रपट म्हणजे १९३२चा *अलिबाबा और चालीस चोर:* कलाकार महंमद नबाब, कज्जन, मुख्तार बेगम, सोराबजी, पी. कपूर, दिग्दर्शक जे. जे. मदन, *गुलेरू झरीना:* कलाकार निस्सार, कज्जन, काबुली, एस. केरावाला, दिग्दर्शक वृजलाल वर्मा, *इंद्रसभा:* कलाकार निस्सार कज्जन, ए. आर. काबुली, मुख्तार बेगम, दिग्दर्शक जे. जे. मदन(*गुलेरू झरीनात* ३७ गाणी होती. *इंद्रसभात* ७१ गाणी. *चार दरवेश:* कलाकार काननबाला, त्रिलोक कपूर, राधा भट्टाचार्य, के. कुमार, एस. दास, अंगूरवाला, दिग्दर्शक राधेश्याम भट्टाचार्य, *हातीमताई*(या चित्रपटाचं वैशिष्ट्य हे होतं की हा चित्रपट चार भागात निर्माण झाला होता.) कलाकार मारूती, बद्रीप्रसाद, सुशीला, शांताकुमारी, गुलाब, फकिरा, सावित्री, दिग्दर्शक जी. आर. सेट्ठी, *डाकू मन्सूर:* कलाकार पृथ्वीराज हुस्नबानू, उमादेवी, सायगल, पहाडी संन्याल, नेमो, दिग्दर्शक नितीन बोस, *सिंहलदीप की सुंदरी:* कलाकार गोहर कर्नाटकी, नवीनचंद्र अली, बच्चा शहजादी, मिरजकर, नेहरून्नीसा, दिग्दर्शक के. देसाई, *अरेबियन नाईट्स:* कलाकार काननबाला, नबाब, मालिनी, सुंदर, हीरालाल, रॉबिन मुखर्जी, देब मुखर्जी, दिग्दर्शक निरेन लहरी, *अल्लाद्दिन और जादूई चिराग:* कलाकार मीनाकुमारी, महिपाल, एस. एन. त्रिपाठी, वसंतराव पहिलवान, जिल्लो, बी. एम. व्यास, बाबू राजे राजा सॅन्डो अझीम, डब्ल्यू. एम. खान, दिग्दर्शक होमी वाडिया, *हूर-ए-अरब:* कलाकार प्रदीपकुमार, शशीकला, चित्रा, कृष्णाकुमारी, नाज, मारूती, मीनाक्षी. *देवता:* कलाकार वैजयंतीमाला, अंजलीदेवी, जैमिनी गणेशन, बिपिन गुप्ता, कमला लक्ष्मण, आगा, कृष्णाकुमारी, डेझी ईराणी, दिग्दर्शक पट्टण्णा, *हातिमताई:* कलाकार जयराज, शकिला बी. एम. व्यास, नयना कृष्णाकुमारी, एस. एम. त्रिपाठी, शेख, दिग्दर्शक होमी वाडिया, *सुवर्ण सुंदरी:* कलाकार अंजलीदेवी, नागेश्वरराव, श्यामा, कुमकुम, आगा, मुकरी, राधाकिशन, सरोजादेवी, डेझी ईराणी, मोहना, धुमाळ, रणधीर, बिपिन गुप्ता, निरंजन शर्मा, वसुंधरा, सप्रू, कमलजीत, दिग्दर्शक व्ही. राघवय्या, *बहुत दिन हुए:* कलाकार मधुबाला, एम. के. राधा, रतनकुमार, पुष्पवल्ली, आगा, स्वराज्य कन्हैयालाल, पी. कैलाश, सावित्री, गुलाब, दिग्दर्शक एस. एस. वासन, *पाताळ भैरवी:* कलाकार एन. टी. रामाराव, मालती, एस. बी. रंगाराव, रेलंगी, गिरिजा, टी. जी. कमला, सुरभी, कमला, बालकृष्ण, दिग्दर्शक के. व्ही. रेड्डी, *पारसमणी:* कलाकार महिपाल, गीतांजली, मनहर देसाई, नलिनी चोणंकर, मारूती, हेलन दिग्दर्शक बाबूभाई मिस्त्री.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ हिंदी आणि मराठी चित्रपटातील एखाद्या कलाकाराच्या जीवनावर चित्रपट निर्माण झाला आहे का? त्यातील मध्यवर्ती भूमिका कोणी साकारली होती?



***भूमिका* चित्रपटात हंसा वाडकरच्या भूमिकेत स्मिता पाटीलसह सुलभा देशपांडे**

— १९५५चा *अमर सायगल* हा चित्रपट सायगलच्या जीवनावर आधारलेला होता. त्यातील सायगलची भूमिका मुगरे या नटाने केली होती. हंसा वाडकर यांच्या 'सांगत्ये ऐका' या आत्मकथेवरून *भूमिका* हा चित्रपट आला होता. यात हंसा वाडकरची भूमिका स्मिता पाटीलने केली होती. मीनाकुमारीच्या जीवनावरून *मीनाकुमारी की अमर कहानी* हा चित्रपट आला होता. यात अभिनेत्री डॉलीने मीनाकुमारीची भूमिका केली होती.